दिनांक :     .०८.२०१९

प्रति,

**माननीय केंद्रीय गृहमंत्री,**

**भारत सरकार, नवी देहली.**

**विषय : ‘‘जय श्रीराम’, अशा घोषणा देण्यास भाग पाडून मारहाण झाली’, असा खोटा कांगावा करणाऱ्या आणि अपप्रचार करणाऱ्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याविषयी ....**

महोदय,

प्रभु श्रीराम हे कोट्यवधी हिंदूंचेच नाही, तर जगभरातील लोकांसाठी आदर्श आणि हिंदूंसाठी परम श्रद्धेय आहेत. त्यांचा जयजयकार आणि स्मरण करावे तितके अल्पच आहे; मात्र गेल्या काही दिवसांपासून ‘जय श्रीराम’चा जयघोष जबरदस्तीने करायला लावला’ आणि ‘आम्हाला हिंदूंनी मारहाण केली’, असा कांगावा धर्मांध आणि तथाकथित पुरोगामी यांच्याकडून केला जात आहे. त्याही पुढे जाऊन ‘जय श्रीराम’च्या घोषणा देण्यास विरोध करणाऱ्यांच्या जमावाकडून हत्या होत आहेत’, असा थयथयाटही त्यांनी चालू केला.

*   **या संदर्भात घडलेली घटना आणि त्यामागील वास्तव काय आहे ?**

**१. औरंगाबाद, महाराष्ट्र येथील घटना :** औरंगाबादमध्ये काही दिवसांपूर्वी ‘एका मुसलमान व्यक्तीला काही हिंदूंनी अडवले आणि ‘जय श्रीराम’ म्हणण्याचा आग्रह केला अन् त्याने तसे म्हटले नाही; म्हणून हिंदूंनी मारहाण केली’, असा आरोप करत त्यावर मोठ्या प्रमाणावर चर्चा, अपप्रचार करण्यात आला; पण पुढे दोनच दिवसांत त्या मुसलमान व्यक्तीनेच त्याच्यावर ‘कोणीही ‘जय श्रीराम’ म्हणण्यासाठी बळजोरी केली नव्हती’, असे मान्य केले. प्रत्यक्षात या प्रकरणातील व्यक्तीला खोटी तक्रार देण्यास भाग पाडून जमावाला भडकवल्याप्रकरणी तेथील धर्मांध नगरसेवक शेख अजीम याला पोलिसांनी अटक केली.

**२. चंदौली, उत्तरप्रदेश येथील घटना :** चंदौली येथे काही दिवसांपूर्वी ‘जय श्रीराम’ न म्हटल्याने खलील अन्सारी या १५ वर्षीय मुसलमान मुलाला पेटवण्यात आल्याचे वृत्त प्रसारित झाले होते; मात्र या मुलाने स्वतः आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याचे आता समोर आले आहे. खलील अन्सारी सकाळी घरातून ‘फिरायला जातो’, असे सांगून बाहेर पडला होता. तो जेव्हा छतेम गावाजवळ पोचला, तेव्हा ‘४ तरुणांनी त्याच्या चेहऱ्यावर कपडा बांधून त्याला शेतात नेले आणि त्याच्यावर तेल टाकून पेटवून दिले अन् तेथून पळून गेले’, असे त्याने सांगितले होते. प्रत्यक्षात घटनास्थळी कोणीही नव्हते आणि त्याने स्वतःहून अंगावर तेल ओतून जाळून घेतले होते. ही घटना तेथून जवळच उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने पोलिसांना सांगितली. ही घटना घडल्यानंतर काही लोकांनी अन्सारी याच्या आईला सांगितले की, ‘‘जय श्रीराम’ म्हणण्यास नकार दिल्याने मारहाण झाली’, असे सांगितले, तर प्रसिद्धी मिळेल.’ या घटनेचा उलगडा झाल्यावर उत्तरप्रदेश पोलिसांनी ‘ट्वीट’ करून सांगितले की, ‘ही घटना तथ्यहीन आणि द्वेष पसरवण्यासाठी रचलेली आहे. याविषयी सामाजिक माध्यमांतून अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाई केली जाईल.’

**३. उन्नाव, उत्तरप्रदेश येथील घटना :** उन्नाव येथील एका मदरशातील एक विद्यार्थी मैदानावर क्रिकेट खेळत असतांना त्याने ‘जय श्रीराम’ची घोषणा न दिल्याने काही जणांनी त्याला मारहाण करण्यात आली, असे वृत्त प्रसारित झाले होते. याचसमवेत कानपूर येथेही काही घटनांमध्ये ‘जय श्रीराम’ घोषणा न दिल्याने मारहाण करण्यात आल्याचे वृत्त प्रसारित झाले होते. असे असले तरी राज्याचे पोलीस महासंचालक ओ.पी. सिंह यांनी वरील दोन्ही प्रकरणे आणि घटना खोट्या असल्याचे म्हटले आहे. सिंह यांनी पुढे सांगितले की, उत्तरप्रदेशमध्ये जातीय दंगे भडकावण्यासाठी धर्मांधांनी ‘जय श्रीराम’च्या घोषणा न दिल्याचे कारण पुढे केल्याचे सांगितले.

*   या संदर्भात पुढील सूत्रे आपल्या निदर्शनास आणून देत आहोत –

१. वरील सर्व घटनांमधून असे लक्षात येते की, प्रत्यक्ष घटना वेगळ्या कारणांमुळे घडत असून पोलिसांकडे केल्या जाणाऱ्या तक्रारींमध्ये जाणीवपूर्वक वेगळा उल्लेख केला जात असल्याचे यातून स्पष्ट होते.

२. या घटनांच्या अनुषंगाने ‘पुरस्कार वापसी’ करणारे तथाकथित समाजसेवक, लेखक आणि कलावंत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवले. या पत्रात ‘रामाचे नाव घेऊन देशात आजपर्यंत जमावाकडून मारहाणीचे २५४ गुन्हे घडले आहेत. अशा घटनांमधील गुन्हेगारांवर कारवाई कधी होणार ? या घटनांमधील दोषींवर अजामीनपात्र गुन्हा नोंदवून त्यांना धाक बसेल, अशा शिक्षेचे प्रावधान करावे’, असे म्हटले आहे.

३. या पत्रलेखकांनी असे पत्र कधी केरळमध्ये साम्यवाद्यांकडून झालेल्या संघ स्वयंसेवकांच्या हत्या, बंगालमध्ये होत असलेल्या भाजप कार्यकर्त्यांच्या हत्या, कर्नाटकमध्ये ‘पॉप्युलर फ्रन्ट ऑफ इंडिया’ या धर्मांधांच्या संघटनेने ८ हिंदुत्वनिष्ठांच्या केलेल्या हत्या, काश्मीरमध्ये जिहादी आतंकवादाने होरपळलेल्या हिंदूची व्यथा यासंदर्भात कधी काही लिहिल्याचे ऐकिवात नाही. कदाचित अशा घटनांमध्ये पीडित समाज हा बहुसंख्य वर्गातील असल्याने त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराची नोंद घेण्याची या वलयांकित व्यक्तींना आवश्यकता पडली नसावी. हा दुटप्पीपणा दुर्दैवी आहे.

४. देशभरात होत असलेल्या सर्व घटनांची सत्यता न पडताळता ‘संपूर्ण हिंदु समाजाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे’ किंवा ‘मॉब लिंचिंग’च्या अनुषंगाने (जमावाकडून होणाऱ्या हत्या) भारताचे नकारात्मक चित्र उभे करणे’ हेही निषेधार्ह आहे.

५. ‘‘जय श्रीराम’ म्हणण्याची सक्ती होत असल्याच्या कथित घटना एकाच कालावधीमध्ये देशाच्या विविध भागांमध्ये घडत असल्याची मांडणी होणे’, हेदेखील एक षड्यंत्र आहे, असेच दिसून येते. याचे धागेदोरे भारतासह विदेशातही असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

※ **तरी या अनुषंगाने आम्ही पुढील मागण्या करत आहोत ......**

१. ‘मॉब लिंचिंग’च्या संबंधातील सर्व प्रकरणांचा तपास विशेष तपास पथक नेमून त्याद्वारे करण्यात यावा.

२. ‘जय श्रीराम’, अशा घोषणा दिल्या म्हणून मारहाण झाली’, असा खोटा कांगावा करणारे आणि अपप्रचार करणारे यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्यात यावी.

३. ज्याप्रमाणे सेक्युलरवाद्यांकडून मागणी झाल्यावर त्यावर लगेच हिंदुत्ववाद्यांना अटक करण्याचा प्रयत्न केला जातो, त्याचप्रमाणे हिंदूंवर होणारे अत्याचार, हिंदूंच्या होणाऱ्या हत्या यांच्या विरोधातही ठोस आणि शीघ्रतेने कृती करावी अन् सर्व समाजघटकांवरील अन्यायाबाबत समतेची भूमिका घेऊन कारवाई करावी.

आपला विश्वासू,

संपर्क :